REVIEW OF LITERATURE

ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 2.0260(UIF)
VOLUME - 4 | ISSUE - 7 | FEBRUARY - 2017

# खानदेशातील दलित सेवक काकासाहेब बर्वे यांच्या व्यक्तिमत्वाचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
**इतिहास विभाग , राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय , पारोळा जि. जळगांव.**

## प्रस्तावना :-

१९ व्या शतकाचा उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पुर्वार्धात संपुर्ण महाराष्ट्र सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीने पार ढवळून निघाला. या कालावधीत प्रबोधनात्मक चळवळींनी जोर धरला. परंपरागत रूढी - परंपराच्या जाचातून समाजाची सुटका करण्यासाठी त्याच बरोबर सनातनी विचारधारा मोडून काढण्याचे काम सुधारणावादी चळवळीने केले. सुधारणावाद्याच्या या धोरणांमुळे समाजावर परिणाम होऊन जाती जमातीमध्ये असलेला तणाव, दुरावा कमी होण्यास मदत झाली. त्यातूनच सामाजिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. सुधारणावाद्यांच्या प्रयत्नाला मिळालेले हे यशच मानावे लागेल. महाराष्ट्राच्या इतर भागाप्रमाणेच खानदेशातही समाज सुधारणा बरोबर धार्मिक सुधारणाही घडून आल्या. अखिल महाराष्ट्राच्या सुधारणा चळवळीत योगदान देणाऱ्या महान व्यक्तिमध्ये खान्देशातील ‘दलित सेवक’ म्हणून ओळखले जाणारे काकासाहेब बर्वे यांचे कार्य अनन्य साधारण महत्वाचे आहे.



## जीवन वृत्तांत :-

'दलित सेवक' म्हणून साऱ्या महाराष्ट्राला परिचित असलेले काकासाहेब बर्वे यांचे पुर्ण नाव श्री. विनायक नरहर बर्वे असे होते. त्यांचे मुळ जन्मस्थळ नाशिक जिल्ह्यातील ‘कोठूर’ हे होय. काकासाहेब बर्वे यांचे माध्यमिक शिक्षण नाशिक येथेच झाले. शिक्षण घेत असतांनाच त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतीकारी चळवळीशी संबंध आला. त्यामुळे त्यांची विचारधारा क्रांतीकारी स्वरूपाची तयार झाली. त्यांना स्वातंत्र्य आंदोलनाविषयी प्रचंड ओढ वाटू लागली. त्यातूनच त्यांची पावले स्वातंत्र्य आंदोलनाकडे ओढली गेली. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना पोलीसांच्या काळ्या यादीत त्यांचे नाव घेतले गेले. त्यानंतर त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. परंतु त्यांचा सावरकरांच्या क्रांतीकारी चळवळीशी संबंध असल्याचा संशयामुळे त्यांना वकीलींची सनद मिळविण्यात अनेक अडचणी आल्या काकासाहेबांनी आपल्या वकीली व्यवसायासाठी खानदेशांतील धुळे शहर निवडले. इ. स. १९१७ पासुन काकासाहेबांनी धुळे येथे वकीली करण्यास सुरूवात केली.

## सामाजिक कार्यात पदार्पण :-

काकासाहेबांनी आपल्या वकीली व्यवसायात अतिशय चांगला नाव लौकीक मिळविला त्यासोबतचं त्यांनी आपल्या सामाजिक कार्याचा प्रारंभ केला. वकीली व्यवसाय न करता सेवाकार्यास आरंभ केला. धुळे येथील पांझरपोळ संस्थेच्या चिटणीस पदाची जबाबदारी सांभाळली. महात्मा गांधींनी पुकारलेल्या असहकार चळवळीला त्यांनी जाहिरपणे विरोध केला. त्यांनी राजकारणात सहभाग न घेता प्रत्यक्ष सेवाकार्याला वाहुन घेतले. इ. स. १९२५ मध्ये खानदेशातील शिरपुर येथे झालेल्या परिषदेत सामाजिक हितासाठी सार्वजनिक प्रयत्न करून लोकजागृती करण्यासाठी एक संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. या पश्चिम खानदेश परिषदेत काकासाहेब बर्वे यांनी ‘अस्पृश्यता’ निवारणाचा ठराव मांडला. या परिषदेत बहुमताने हा मंजुर करण्यात आला. परंतु तथाकथित सुधारणावाद्यांनी या बहुमताने मंजुर झालेल्या ठरावाला विरोध केला.

### समाज प्रबोधनाचे कार्य :-

काकासाहेब बर्वे यांनी पश्चिम खानदेश जिल्हा खादी मंडळाचे अध्यक्ष असतांना खानदेशात फिरून ठिकठिकाणी सभांमधून प्रबोधनात्मक विचार मांडले. हातमाग, खादीचे महत्व त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. त्याचबरोबर व्यसनाधिनता आणि त्यांचे दुष्परीणाम स्पष्ट केले. सत्यशोधक आणि ब्राम्हणेतर चळवळीच्या कार्येकर्त्यांच्या भुमिकेचे त्यांनी समर्थन केले. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी मोलाचे सहकार्य केले. या त्यांच्या विचारधारेमुळे मात्र त्यांनी स्वजातीच्या लोकांच्या रोष ओढवून घेतला. इ. स. १९२८ मध्ये निफाड येथे ब्राम्हणेतरांच्या सभेतही काकासाहेबांनी आपले परखड विचार मांडले. आपले सुधारणावादी विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी १ जुन १९४१ रोजी 'दलित सेवक' नावाचे नियत कालिक सुरू केले. त्यांनी या वृत्तपत्राच्या माध्यमातुन मानवता धर्माचा प्रचार केला. मंदिर आणि सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्य, दलितांना प्रवेश मिळावा यासाठी प्रबोधन केले. त्याच बरोबर आपल्या लिखाणातुन परंपरागत समाज मनावर समतेच्या विचारांचे बिजारोपन केले. काकासाहेबांनी सुरू केलेल्या या सेवाकार्यात पुढे अनेक सेवाभावी लोक जोडले गेले. काकासाहेबांनी आपली धर्म विषयक भुमिका मांडण्यासाठी ‘आचार धर्म’ नावाची पुस्तिका लिहिली. त्यांनी वैदिक वांड्मयाचा आधार घेऊन समाजातील अस्पृश्यता, बालविवाह, रोटीबेटी बंदी या सारख्या अनिष्ठ प्रथा परंपरावर विषयी वैचारिक प्रबोधन केले. सनातनी लोकांचा धर्मवेडेपणा, अंधश्रध्दा या विषयी ही त्यांनी दलित सेवक या आपल्या नियत कालीकेत प्रखर विचार मांडले. त्यांनी अंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. जाती व्यवस्था मोडण्यास अंतरजातीय विवाह फायदेशिर आहे. प्रतिलोक विवाह कायदेशीर समजला पाहिजे. सर्व जातींना सारखाच दर्जा असला पाहिजे . म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित होईल असे परखड विचार काकासाहेबांचे होते. इ. स. १९५३ मध्ये पुणे येथे भरलेल्या महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या अधिवेशनात काकासाहेबांनी अस्पृश्यता निवारण, भंगी विमोचन, कुटूंब नियोजना सारखे ठराव त्यांच्याच पुढाकाराने मांडले गेले. काकासाहेब कामगार, मजुर वर्गाच्या हिताच्या ठरावांना विविध परिषदामध्ये प्राधान्य देत असत.

### अस्पृश्यता निवारणाचे कार्य :-

काकासाहेब बर्वे यांच्या कार्याचा अभ्यास करतांना त्यांनी केलेले अस्पृश्यध्दाराचे कार्य हे अतिशय मोलाचे आहे. महाराष्ट्राच्या समाज सुधारणा चळवळीत दोन प्रकारचे समाज सुधारक दिसून येतात. त्यात एक बोलके सुधारक आणि दुसरे कर्ते सुधारक काकासाहेब दुसऱ्या गटातील होते. त्यांनी नुसते विचार मांडले नाहीत तर कृतीतून त्या विचारांना आकार दिला. हरिजन सेवक संघाच्या महाराष्ट्र प्रांताध्यक्ष पदी निवड झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी पुर्व खानदेशातील भुसावळ, यावल, रावेर, चोपडे, याठिकाणी भेट देवून आपल्या व्याख्यानातून प्रबोधन केले. १७ ऑक्टोंबर १९३७ रोजी धुळे येथे झालेल्या सहभोजन कार्यक्रमात स्वःता सहभाग घेतला. ज्याठिकाणी महार, चांभार, भंगी इ. चा सहभाग होता. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करण्यास सनातनी मंडळीचा प्रखर विरोध होता. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी झालेल्या आंदोलनात काकासाहेबांनी सक्रीय सहभाग घेतला. धुळे शहरातील श्रीराम मंदिर अस्पृश्यांना खुले करण्याबाबत काकासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना यश आले. हरिजनांना माणुसकीने वागवा, त्यांना नागरीकत्वाचे हक्क प्रत्यक्षात भोगू द्या असे काकासाहेबांचे आग्रही मत होते. खानदेशात त्यांच्याच प्रयत्नातून अस्पृश्य, भंगी इत्यादींच्या उन्नतींसाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. काकासाहेबांच्या अस्पृश्यता निवारणाच्या या सेवाभावी कार्याची मुंबई सरकारने दखल घेऊन ‘मुंबई इलाखा प्रांतिक बॅकवर्ड क्लास’ मध्ये त्यांची व भाऊसाहेब जावडेकर यांची निवड केली. काकासाहेब बर्वेच्या उपस्थितीत एदलाबाद जवळील पारंबी गावातील श्रीरामाचे मंदिर, भडगांव येथील जकातदार यांच्या मालकीचे मंदिर तसेच भादली येथील मंदिर अस्पृश्यासाठी खुले करण्यात आले.

### भंगी समाजाचे मानवतेचे प्रश्न सरकार दरबारी मांडले :-

काकासाहेब बर्वेनी हरिजन सेवक संघाच्या वतीने भंगी समाजाचे प्रश्न आणि समस्या सरकार दरबारी मांडल्या. त्या लोकांना निदान मानवतेची वागणुक मिळावी यासाठी त्यांनी अट्टहास धरला. त्यामुळेच मुंबई सरकारने भंगी समाजाचे सेवाकार्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी इ. स. १९५० मध्ये काकासाहेब बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यांनी ठिकठिकाणी भेटी देऊन भंगी समाजाची परिस्थिती जाणून घेतली. त्यांच्या समस्या, प्रश्नांचा अभ्यास करून या समितीने सरकारला एक अहवाल केला. ‘भंगी लोकांची डोक्यावरून मैला वाहण्याची पध्दती अमानुषपणाची आहे. भंगी लोकांना या काळी सोसावा लागणारा त्रास दुर करून त्यात सुधारणा झाल्या पाहिजेत’ असे काकासाहेबांचे स्पष्ट मत होते. मैला हाताने काढण्याची व डोक्यावरून नेण्याची पध्दत बंद करावी. याबाबत ते आग्रही होते. गांधीजीच्या विधायक कार्यक्रमावर श्रध्दा ठेवणारे काकासाहेब अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात समाजातील विविध घटकांची, वेगवेगळया विचारप्रणालींच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची सहानूभूती, पाठिंबा मिळविण्यात ते यशस्वी झाले. भंगी समाजाची स्थिती सुधारण्यासाठी त्यांच्यात शिक्षण प्रसार व्हावा अशी त्यांची प्रमाणिक तळमळ होती.

**सारांश :-**

१९ व्या शतकात आणि २० व्या शतकाच्या पुर्वाधात खानदेशातील समाजावर धर्मकल्पनांचा आणि त्याला आनुषंगिक कर्मकांडाचा फार मोठा परिणाम झालेला होता. समाजाच्या अधोगतीस काराणीभूत ठरणाऱ्या रूढींचा व अंधश्रध्देस पोषक ठरणाऱ्या गोष्टीचा त्याग केल्याने भावी पिढीची प्रगती होईल ही विचारधारा घेऊन काकासाहेब बर्वे समाज सुधारणा चळवळीत सहभागी झाले. परिवर्तन हा निसर्गाचा स्थायीभाव असला तरी दु:खमुक्त मानवी समाजाच्या निर्मितीसाठी परिवर्तनाच्या प्रवाहांना विधायक वळण देणे आवश्यक असते, हे विधायक वळण काकासाहेब बर्वे यांनी आपल्या विचार कार्यातून केले. त्यांनी आपल्या अंगी असलेल्या ज्ञानाचा उपयोग समाज परिवर्तनांसाठी केला. 'अस्पृश्यता' या प्रश्नावर त्यांनी शास्त्रोक्त भुमिका स्पष्ट केली. त्यांच्या त्यागी, नि:स्वार्थी आणि उदात्त हेतूने प्रेरित झालेल्या सुधारणावादी विचारवंतांमुळेच समाज जागृती होवून नव्या जाणीवा, नवी विचारधारा पुढे आली. सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी भुमिका स्विकारून समाजाला परिवर्तनवादी दिशा देण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले. काकासाहेबांनी 'दलित सेवकांतून' मांडलेली वैचारिक भुमिका दलितांना जागृत करणारी आणि सवर्णांना अंर्तमुख करणारी होती. काकासाहेबांनी केलेले सर्वांगिण क्षेत्रातील कार्य हे त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचीच साक्ष देते.

**संदर्भ :-**

१) भनसाळी डी. एम. (संपा.) - संयुक्त खानदेश डिरेक्टरी अर्थात खानदेशचा इतिहास
२) पाटील भी. ना. - खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ
३) बर्वे वि. न., बागुल देविदास (संपा.) - मानवधर्म विवेचन
४) सरदार गं. बा - महाराष्ट्र जीवन पंरपरा, प्रगती आणि समस्या.